
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १९५
www.ramprahar.com
# राम प्रहर
शुक्रवार, ३१ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

एमपीएससीच्या प्रश्नपत्रिका सुरक्षित -सुवर्णा खरात/२
पनवेल मनपातर्फे विद्यालयात 'पर्यावरण तास'/३
वेटलिफ्टिंगमध्ये महाराष्ट्राचा पदकांचा षटकार/८

## अमेरिकेत विमान हेलिकॉप्टरला धडकले; ६७ ठार



**वॉशिंग्टन :** अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डीसीमध्ये रीगल राष्ट्रीय विमानतळाच्या जवळ आकाशात अमेरिकन एअरलाईन्सचे विमान आणि हेलिकॉप्टरची भीषण धडक झाली. अपघातानंतर विमान आणि हेलिकॉप्टर एका नदीत कोसळले. त्यानंतर मदतकार्य सुरू झाले वॉशिंग्टनच्या अग्निशमन दलाच्या प्रमुखांनी दिलेल्या माहितीनुसार, या अपघातात सर्वच्या सर्व ६७ जणांचा मृत्यू झाला आहे. विमान आणि हेलिकॉप्टरच्या अपघातात कोणीही वाचले नाही. वाहतूक सचिवांनी दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकन एअरलाईन्सचं विमान पोर्टेमाक नदीत कोसळले. अपघातानंतर विमानाचे तीन तुकडे झाले. ते नदीत सापडले. अमेरिकन ईगल फ्लाईट ५३४२ रीगन विमानतळाजवळ लष्कराच्या ब्लॅक हॉक हेलिकॉप्टरला धडकले. नदीतून आतापर्यंत १९ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.



**मुंबई : करंजा मच्छीमार बंदराच्या दुसऱ्या टप्प्यातील कामे, मच्छिमारांना डिझेल परतावा तसेच डिझेल कोटा मंजूर करण्याबाबत राज्याचे मत्स्योद्योग व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांची आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी भेट घेतली. या वेळी उरण नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, करंजा मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा, राजेश नाखवा, कैलास कोळी, महेंद्र कोळी, विलास नाखवा आदी उपस्थित होते. या वेळी सकारात्मक चर्चा झाली असून लवकरच या संदर्भात बैठक घेण्याचे ना. नितेश राणे यांनी आश्वासित केले.**

# बीडमधील चुकीचे पायंडे बंद करा

## अजितदादांचा बैठकीत नेते, अधिकाऱ्यांना सज्जड दम

## खंडणीखोरांना मकोकाचा इशारा; चारित्र्य स्वच्छ ठेवण्याचा सल्ला

**बीड : प्रतिनिधी**

जिल्ह्यात मागील काही कळत तुम्ही चुकीचे पायंडे पाडले आहेत. ते आधी बंद करा, मला बेशिस्त चालत नाही, तुमच्यावर जर कोणी दबाव आणून चुकीचे काम करून घेत असतील. तर माझ्याशी संपर्क साधा मी उपलब्ध आहे, मात्र कोणतेही चुकीचे काम खपवून घेणार नाही, असा सज्जड दम राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी (दि.३०) बैठकीत सर्वांनाच दिला.

जिल्हा नियोजन मंडळाची बैठक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात झाली. या वेळी मंत्री पंकजा मुंडे, मंत्री धनंजय मुंडे, राज्यसभेच्या खासदार रजनी पाटील, लोकसभेचे खासदार बजरंग सोनवणे, यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आमदारांची उपस्थिती होती.



उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार म्हणाले की, चारित्र्य आणि जनमानसात प्रतिमा स्वच्छ ठेवा. चुकीचे काम केल्यास मकोका लावायला मागेपुढे पाहणार नाही. बीड सध्या सातत्याने चर्चेत आहे, पण ज्या घटनांमध्ये तथ्य असेल तिथे कारवाई करणार. खंडणीची प्रकरणं खपवून घेणार नाही. रिव्हाल्वर लावून फिरतील त्यांचा परवाना रद्द करण्यास सांगणार. चुकीची माणसं आजूबाजूला ठेऊ नका. रिल वगैरेही खपवून घेतली जाणार नाहीत. आपले आपले स्वतःच चारित्र्य स्वच्छ ठेवा, असा अप्रत्यक्ष टोला पवार यांनी धनंजय मुंडे यांना लगावला.

चुकीचं वागू नका जवळचा असेल तरी कारवाई होणार. कोणी काय केल तर राजकीय हस्तक्षेप होऊ देणार नाही. कोणावर अन्याय होऊ देणार नाही. जनतेचा पैसा सत्कारणी लागला पाहिजे. विकासकामे करत असताना खंडणीचे प्रकार करू नका, नाहीतर मकोका लावायला मागेपुढे पाहणार नाही. जर कोणी वेडेवाकडे प्रकार केले तर सगळ्यांना नियम सारखे असतील. माझी कामाची पद्धत वेगळी आहे. सर्व कामे दर्जेदार झाली पाहिजेत, असा इशाराही त्यांनी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत दिला.

जिल्ह्यात अशा घटना होत राहिल्या तर उद्योगपती येऊन इथे गुंतवणूक करणार नाहीत. त्यामुळे अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी याचा विचार करून जिल्ह्याची बदनामी थांबवून जिल्ह्याच्या विकासासाठी काम करावे, अशा सूचनादेखील त्यांनी या वेळी दिल्या. ते पुढे म्हणाले की, बीड शहरातील रस्त्यांची दुरवस्था आहे. डॉक्टर, व्यापारी आणि समाजातल्या विविध प्रतिनिधींची बैठक मी पुढे घेणार आहे. पत्रकार, साहित्यिक, कलेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना सोबत घेऊन काम करायचं आहे. चांगल्या इमारती कशा उभ्या करता येतील, हे बघावं लागेल. विविध योजना, विकासकामे, पाण्याचे, स्वच्छतेचे प्रश्न सोडवले जाणार आहे. मंत्रिमंडळातले दोन सहकारी आहेत.

धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांना विश्वासात घेऊन आणि कुठलाही भेदभाव न करता आपल्याला पुढे जायचे आहे. अधिकाऱ्यांना सल्ला देताना तुम्ही ही कुठलाही भेदभाव करायचा नाही येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी तुम्ही बांधील आहात. त्यामुळे तुम्ही कुणासाठी पायघड्या घाला आणि कोणाला बाहेर ताटकळत ठेवले. तर अजित पवारशी गाठ आहे, हे लक्षात ठेवा.

## महाकुंभमेळ्यात पुन्हा अग्नितांडव

**प्रयागराज : वृत्तसंस्था**



उत्तरप्रदेशात सुरू असलेल्या महाकुंभादरम्यान आगीची दुसरी दुर्दैवी घटना घडली आहे. गुरुवारी (दि.३०)महाकुंभ मेळ्याच्या बाहेरील बाजूस बांधलेल्या टेंट सिटीमध्ये भीषण आग लागली.

झुंसी येथील छतनाग घाटातील नागेश्वर घाट सेक्टर २२ जवळ लागलेल्या आगीत सुमारे १५ तंबू जळून राख झाले आहेत. अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले आहे. तर या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे समजते, मात्र आगीचे कारण अद्याप समोर आलेले नाही.

महाकुंभ मेळ्यादरम्यान गुरुवारी दुपारी लागलेल्या या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे वृत्त आहे. १५ तंबूंना आग लागल्याची माहिती पोलिसांनी दिली. तर रस्ता चांगला नसल्याने घटनास्थळी पोहोचायला थोडा वेळ लागला असल्याचेही त्यांनी सांगितले. हे मंडप परवानगीशिवाय उभारण्यात आल्याचे समोर आले असून ही माहिती जवळच्या पोलीस ठाण्यात कळवण्यात आली आहे. याआधी २० जानेवारीलाही महाकुंभा मेळ्यादरम्यान भीषण आग लागल्याची घटना घडली होती. यामध्ये गीता प्रेसच्या छावणीसह मोठ्या प्रमाणात तंबू जळून खाक झाले होते. त्यानंतर काही जण जखमी झाल्याचीही माहिती समोर आली आहे. तर बुधवारी चेंगराचेंगरीची घटना घडल्यानेदेखील लोकांमध्ये खळबळ उडाली होती.

## राज्य सरकारच्या आश्वासनानंतर मनोज जरांगेंचे उपोषण स्थगित

**जालना :** राज्य सरकारच्या आश्वासनानंतर मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी (दि.३०) अखेर उपोषण स्थगित करण्याची घोषणा केली आहे. राज्य सरकारच्या वतीने भाजप आमदार सुरेश धस यांनी त्यांना ज्यूस देऊन हे उपोषण सोडवले. यानंतर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आम्ही मराठा समाजाच्या संदर्भात जे काही निर्णय घेतले आहेत ते महायुतीच्या सरकारनेच घेतले आहेत. कायद्याच्या चौकटीतील ज्या ज्या मागण्या ते करतील त्या मागण्या आम्ही निश्चित मान्य करू.

## चिरनेरमधील बर्ड फ्लू आटोक्यात

**उरण : प्रतिनिधी**

चिरनेर परिसरात पसरलेली बर्ड फ्लूची साथ आटोक्यात आली असल्याचा दावा जिल्हा पशुधन विभागाने केला आहे.

बर्ड फ्लूला अटकाव करण्यासाठी उपाययोजना सुरू असून पोल्ट्री फार्म मधिल नियमितची स्वच्छता आणि वेळोवेळी करण्यात येणारी औषध फवारणी याबाबत येथील पशुधनाची तपासणी सुरू आहे. त्यामुळे नागरिकांनी चिकन आणि अंडी शिजवून खाण्यास कोणतीही हरकत नसल्याचा दावा तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही रायगड जिल्हा परिषदेचे पशुधन विकास उपायुक्त सचिन देशपांडे यांच्याकडून करण्यात आले आहे.

चिकन, अंडी खाण्यास काहीही अडचण नाही. फक्त ते चांगल्या प्रकारे शिजवून खाण्याचे आवाहन त्यांनी केले.

## निवडक

### काँग्रेस खासदाराला बलात्कारप्रकरणी अटक

**सीतापूर :** काँग्रेस खासदार राकेश राठोड यांना गुरुवारी उत्तर प्रदेशातील सीतापूर येथे एका महिलेने दाखल केलेल्या बलात्काराच्या प्रकरणात अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे राठोड यांची पत्रकार परिषद सुरू असताना पोलीस त्यांना घेऊन गेल्याचे पाहायला मिळत आहे. सीतापूरचे खासदार राठोड हे त्यांच्या घरी पत्रकार परिषदेच्या घेत होते त्याच वेळी उत्तर प्रदेश पोलिसांनी त्यांना अटक केली.

### विचित्र हवामान; राज्यावर अवकाळी पावसाचे सावट

**मुंबई :** दक्षिण भारतामध्ये तापमानातील चढ-उतार कायम असल्यामुळे काही किनारपट्टी क्षेत्रांवर पावसाचे ढग घोंगावताना दिसत आहेत. सततच्या या हवामान बदलामुळे राज्यावर पावसाळी ढगांचे सावट पाहायला मिळणार असल्याचा इशारा हवामान विभागाने जारी केला असून पुढील ४८ तासांत भर पडून पश्चिम महाराष्ट्रासह राज्याच्या काही भागांमध्ये पावसाच्या हलक्या सरींची शक्यता आहे.

## शिक्षण क्षेत्रात विज्ञानाकडून तंत्रज्ञानाकडे वाटचाल

### केबीपी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांचे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षण क्षेत्रात विज्ञानाकडून तंत्रज्ञानाकडे वाटचाल होत असल्याचे प्रतिपादन सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांनी केले. ते खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात बोलत होते.




जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगु काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचा (स्वायत्त) वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आणि दर्पण २०२४-२५ सोहळा झाला. या वेळी पहिल्या सत्रात प्रमुख अतिथी म्हणून सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. ज्ञानदेव म्हस्के, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची विशेष उपस्थिती लाभली.

या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, पनवेल महानगरपालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य अनिल भगत, संजय भगत, प्रकाश भगत, एम.पी.ए.एस.सी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर आदी मान्यवरांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती या सोहळ्याला लाभली. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे डॉ. रत्नप्रभा म्हात्रे संपादित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जीवनपटावर आधारित जिज्ञासा या २७व्या लघुअंकाचे अनावरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. तसेच प्रमुख पाहुण्यांची ओळख इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. आर. व्ही. येवले यांनी करून दिली. यानंतर महाविद्यालयातील क्रीडा, कला, संशोधन, सेवा क्षेत्रातील ज्या विद्यार्थ्यांनी विभागीय, विद्यापीठीय, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर दैदिप्यमान यश प्राप्त केले अशा विद्यार्थ्यांचा आणि महाविद्यालयीन स्पर्धेमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. **(पान २ वर..)**

## पक्षांतर्गत वादामुळे ठाकरे गटाची सरपंच ठरली अपात्र

**नागोठणे : बातमीदार**

रोहा तालुक्यातील ग्रामपंचायतींपैकी श्रीमंत व नेहमीच चर्चेत असणारी ग्रुप ग्रामपंचायत ऐनघरच्या विद्यमान सरपंच अर्चना सचिन भोसले यांना २९ जानेवारी रोजी मुंबई उच्च न्यायालयाने अपात्र ठरवत दणका दिला आहे. त्यामुळे माजी सरपंच कलावती राजेंद्र कोकळे या पुन्हा सरपंचपदी विराजमान होणार आहेत.

याबद्दल सविस्तर वृत्त असे की, काही महिन्यांपूर्वी ग्रामपंचायत सदस्यांच्या बैठकीत सरपंच कलावती कोकळे यांनी राजीखुशीने राजीनामा दिला होता. या राजीनाम्याबाबत पंचायत समिती रोहा येथे पत्रव्यवहार करण्यात आला. त्या संदर्भात पुन्हा ग्रामपंचायत सदस्यांची बैठक आयोजित करून सदर राजीनामा सर्वानुमते मागे घेण्यात आला व तसे पत्र पंचायत समिती रोहा येथे देण्यात आले. ७ जून रोजी जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार तहसीलदार निवडणूक अधिकारी रोहा यांच्यामार्फत प्राप्त झालेल्या पत्रानुसार १३ जून रोजी निवडणूक घेतली. या वेळी सरपंच अर्चना भोसले यांची निवड करण्यात आली. कलावती कोकळे यांनी झालेल्या अन्यायाबाबत वाचा उठवत रायगड जिल्हा सत्र न्यायालयाकडे याचिका सादर केली, मात्र त्या ठिकाणी सत्र न्यायालयाचा निर्णयविरोधात दिल्याने त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

मुंबई उच्च न्यायालयाने सरपंच अर्चना सचिन भोसले यांना २९ जानेवारी रोजी अपात्र ठरविले व पुन्हा सरपंचपदी कलावती राजेंद्र कोकळे यांना पात्र ठरवत सरपंच पदासाठी मंजुरी दिली, अशी माहिती ऐनघर ग्रामपंचायत सदस्य मनोहर सुटे यांनी दिली आहे.




**अलिबाग : तालुक्यातील आवास ग्रामस्थांतर्फे आयोजित करण्यात आलेल्या हिंदकेसरी बैलगाडी शर्यतीचा थरार रंगला होता. ही शर्यत सर्वांत मोठी व मानाची म्हणून प्रसिद्ध आहे.** (छाया : जितू शिगवण) **(वृत्त पान ७ वर..)**

## ज्येष्ठ व्यक्तीचा चिमुरडीवर अत्याचार

### आरोपीला अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या तालुक्यातील शेडुंग येथे हरी नावाच्या ६३ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने चार वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पोलिसांत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पीडित मुलगी आणि आरोपी एकाच सोसायटीमध्ये राहण्यास आहे. याच खासगी सोसायटीमधील लिफ्टच्या बाजूला असलेल्या भिंतीलगत ज्येष्ठ नागरिकाने चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केला. पनवेल तालुका पोलिसांनी नराधम आरोपी हरी याला अटक केली आहे. त्याला ३ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. अधिक तपास सुरू आहे.

## जेएनपीएच्या प्रकल्पांचा केंद्रीय मंत्री शांतनु ठाकूर यांच्याकडून आढावा

**उरण : वार्ताहर**

केंद्रीय बंदरे, जहाज वाहतूक आणि जलमार्ग राज्यमंत्री शांतनु ठाकूर यांनी बुधवारी जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाला (जेएनपीए) भेट दिली. जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष आणि वाढवण बंदर प्रकल्प लिमिटेडचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक उन्मेष शरद वाघ यांनी त्यांचे स्वागत केले.

पर्यावरण मंजुरी, सार्वजनिक सुनावणी आयोजित करणे आणि व्हीपीपीएलची पायाभरणी करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल मंत्री महोदयांनी पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडके आणि पोलीस अधीक्षक, पालघर बाळासाहेब पाटील यांचा सत्कार केला. त्यानंतर यशवंतराव



चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि वाढवण बंदर प्रकल्प लिमिटेड यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या सहकार्याअंतर्गत, विद्यापीठ वाढवण बंदराच्या परिचालन गरजांनुसार आवश्यक कौशल्य-आधारित कार्यक्रमांची रचना आणि संचालन करेल.

मंत्री महोदयांनी भागधारकांच्या बैठकीला संबोधित केले, भारताच्या सागरी क्षेत्राच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि व्यापार व्यवहार सुगम व सुलभ करण्यासाठी धोरणात्मक उपक्रमांवर चर्चा करण्यासाठी संवाद साधला.

भेटीदरम्यान ना. शांतनु ठाकूर यांच्या हस्ते जने बंदरातील लँडिंग जेट्टी येथे प्रवेशद्वार इमारतीचे बांधकाम आणि त्याच्या आसपासच्या क्षेत्राच्या विकासासाठी भूमीपूजन समारंभ पार पडला.

## एमपीएससी प्रश्नपत्रिकांसाठी ४० लाखांची मागणी

# आमच्या प्रश्नपत्रिका सुरक्षित -सुवर्णा खरात

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे २ फेब्रुवारी, २०२५ रोजी परिक्षा आयोजित करण्यात आलेल्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याबाबत संदेश व्हायरल झाले असून, अनेक विद्यार्थ्यांना फोन देखील गेल्याचे उघड झाले आहे. याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सचिव सुवर्णा खरात यांनी, विद्यार्थ्यांना कोणत्याही अमिषाला बळी न पडण्याचे आवाहन केले आहे . प्रश्नपत्रिका लीक झालेली नसून, त्या आमच्याकडे सुरक्षित आहेत. त्यामुळे येणारे फोन हे सायबर फ्रॉड असून, याबाबत पुणे पोलिसांना तक्रार केल्याचे खरात यांनी सांगितले. यांविषयी खरात यांनी नवी मुंबई बेलापुर येथील एमपीएससी कार्यालयात पत्रकार परिषद घेत माहिती दिली.

पुण्याच्या एका स्थानिक वृत्तपत्रामध्ये दिनांक ३० जानेवारी २०२५ रोजीये महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या 'महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४' या परीक्षेची प्रश्नपत्रिका उमेदवारांना उपलब्ध करून देण्यासंदर्भातील बातमी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. या संदर्भातील रेकॉर्डिंगही त्या वृत्तपत्राच्या हाती लागले असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. तसेच, काही भ्रमणध्वनी क्रमांकावरुन उमेदवारांना प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवून पैशाची मागणी केली जात असल्याचे निदर्शनास आल्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे पोलीस आयुक्त, पुणे यांचेकडे तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत परीक्षेच्या सर्व प्रश्नपत्रिका अत्यंत कडेकोट बंदोबस्तात सुरक्षित असून अशा बातमीमध्ये कोणतेही तथ्य नाही. उमेदवारांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच असे दूरध्वनी आल्यास contact-secretaympsc.gov.in या ईमेलवर या संदर्भातील तक्रार दाखल करावी. उमेदवारांनी अशा प्रकरणांमुळे विचलित न होता अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. प्रस्तुत प्रकरणी पोलीस आयुक्त, पुणे यांच्याकडून चौकशी करण्यात येत असल्याचे खरात यांनी सांगितले.

*उमेदवारांनी अमिषाला बळी पडू नये. प्रसिद्धी पत्रक आपण देणार आहोत. परिक्षेत विघ्न आणण्याचा कदाचित यामागे हेतू असावा असा संशय सचिव सुवर्णा खरात यांनी व्यक्त केला.*

***प्रश्नपत्रिकांसाठी तब्बल ४० लाखांची मागणी***

*पोलीस, सेल्स टॅक्स, मंत्रालयातील पदे आहेत. १० विभागांमध्ये परीक्षा घेणार आहोत. आमच्या परीक्षेबाबत सर्व नियोजन केले आहे. प्रश्नपत्रिका सुरक्षित आहेत. प्रश्नपत्रिका देण्यासाठी तब्बल ४० ते ४५ लाखांची मागणी करण्यात येत असल्याचे व्हायरल कॉल रेकॉर्डिंग वरून माहिती प्राप्त झाल्याचे खरात यांनी सांगितले. हा सायबर फ्रॉड असावा अशी शंका आम्हाला आहे.*

***दोन लाख ८६ हजार विद्यार्थी देणार परीक्षा***

*तब्बल दोन लाख ८६ हजार विद्यार्थी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची विविध पदांसाठी ऑफ लाईन परीक्षा देणार आहेत. संपूर्ण जिल्ह्यात ८६९ केंद्रांमध्ये आहे. दीड महिना आधी आमच्या प्रश्न पत्रिका तयार होतात. पैसे देऊन प्रश्नपत्रिका उपलब्ध करण्याबाबत तीन तक्रारी आम्हाला आल्या आहेत. त्या उमेदवारांचे नंबर मिळवून व्हॉटसप कॉल तसेच नॉर्मल कॉल देखील आले आहेत.*

## मुरूडमध्ये आदिवासींना जातीच्या दाखल्याचे वाटप



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड हा डोंगरी तालुका असून येथे आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात आहे. मोलमजुरी करून हा समाज आपल्या कुटुंबाचा गुजराण करीत असतो. उपेक्षीत जीवन जगत असणाऱ्या या समाजाला जातीचा दाखला मिळावा व भावी पिढीला नोकरी मिळावी या उद्दात हेतूने उप विभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी स्वतः पुढाकार घेत व तहसीलदार मुरुड रोहन शिंदे यांच्या उत्तम सहकार्यातून मुरुड तालुक्यातील टेंभोर्डे आदिवासी वाडी मधील ३० आदिवासी कुटुंबातील लोकांना जातीच्या दाखल्याचे वाटप त्यांच्या घरी जावून करण्यात आले.

केवळ तीन दिवसांत कागदपत्रे जमा करून हे दाखले या कुटुंबाला त्वरित देण्यात असल्याने आदिवासी कुटुंबाच्या चेहऱ्यावर हास्य फुलले होते.

या वेळी मंडल अधिकारी तुषार काकडे तलाठी अमृत चोगले सरपंच हर्षद महाडिक माजी सरपंच काशिनाथ वाघमारे उपसरपंच प्रसाद चौलकर, माजी सभापती बाबू नागावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## महामार्गाच्या चुकीच्या नियोजनामुळे खारेपाट विभागाला पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन लिकेज



**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वाशी खारेपाट विभाग हा गेल्या अनेक वर्षापासून पाणीटंचाईचा सामना करत असताना येथील तरणखोप ते खारेपाट विभाग अशी पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन महामार्गावरील पेट्रोल पंपाजवळ लिकेज झाल्याने खारेपाटाला पाणीपुरवठा होत नाही.सदर पाईप लाईन पुलाखाली दबली गेली असून तिथे शंभर मीटर नव्याने पाईपलाईन टाकावी लागेल असेही पाणीपुरवठा विभागाकडून सांगण्यात आले.

महामार्गाच्या चुकीच्या नियोजनामुळे मुंबई- गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामामध्ये पेण शहराजवळून टाकण्यात आलेला पूल शहराच्या पेट्रोल पंपाजवळ असणाऱ्या पाणीपुरवठा लाईन वर पुलाचे कॉलम उभे झाल्याने सदरची पाईपलाईन त्याखाली दबून ती लिकेज झाली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी जाऊन पाणी केली असता तिथे लिकेज झालेल्या पाईपलाईन मधून मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात होते. अधिक तपासणी केली असता सदर पाईप लाईन ही त्या पुलाखाली दबली गेली असल्याने त्या ठिकाणी खोदकाम केले तर पुलाला धोका निर्माण होऊ शकतो त्यामुळे या ठिकाणी जवळपास शंभर मीटर नव्याने पाईपलाईन टाकण्यात यावी असे संबंधित अधिकारी यांनी प्रांताधिकारी प्रवीण पवार यांना निदर्शनात आणून दिले

प्रांताधिकारी यांनी संबंधित ठेकेदार यांच्याशी संपर्क करुन खारेपाटातील नागरिकांसाठी तातडीने सदरची पाईप लाईन नव्याने जोडणी करण्यात यावी असे निर्देश दिले आहेत.

शहराच्या पेट्रोल पंपाजवळ पाईपलाईन लिकेज होऊन मोठ्या प्रमाणावर पाणी वाहत असल्याचे पत्रकार राजेश कांबळे यांनी निदर्शनास आणून दिले होते सदरची लाईन पुलाच्या खाली असल्याने ती दबली आहे म्हणून तिथे काही खोदकाम करू शकत नाही

**पान १ वरून**

## शिक्षण क्षेत्रात विज्ञानाकडून तंत्रज्ञानाकडे वाटचाल

महाविद्यालयातील शैक्षणिक पात्रता वृद्धिंगत करणारे प्राध्यापक वर्ग तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनासुद्धा सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा नृत्य, गायन, आणि अभिनय यांचा कला संगम असणारा दर्पण २०२४-२५ हा कार्यक्रमसुद्धा मोठ्या दिमाखात साजरा करण्यातआला.

या कार्यक्रमामध्ये प्रो. डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांनी आपल्या भाषणात महाविद्यालयाला नॅक तर्फे ए++मुल्यांकन प्राप्त झाल्याबद्दल प्राचार्य, विद्यार्थी, शिक्षक, यांचे भरभरून अभिनंदन केले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना उदेशून सांगितले की, मानव अज्ञानाकडून ज्ञानाकडे आणि ज्ञानाकडून विज्ञानाकडे आणि आत्ता विज्ञानाकडून तंत्रज्ञानाकडे वाटचाल करत आहे म्हणून या तंत्रज्ञानाअंतर्गत शिक्षकांनी एआय प्रणालीचा वापर शैक्षणिक क्षेत्रात केला पाहिजे, असे आपल्या मार्गदर्शक भाषणातून सांगितले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना विविध क्षेत्रात अशीच प्रगती करा आणि महाविद्यालयाचे नाववृद्धींगत करा आणि माजी विद्यार्थी झाले तरी महाविद्यालयाची आठवण ठेवा असे संबोधिले. या सोहळ्याचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. गीतिका तंवर यांनी केले. प्रा. डॉ.आर.व्ही.येवले, प्रा. ए. व्ही. पाटील आणि प्रा. डॉ. गीतिका तंवर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

दुसऱ्या सत्रात दर्पण २०२४-२५ या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी मनोरंजक व भाषण तज्ञ आणि लेखक संजीवन म्हात्रे यांची अतिथी म्हणून विशेष उपस्थिती लाभली. त्याचबरोबर प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील, कलाशाखेचे प्रमुख प्रो.डॉ. बी. एस. पाटील, वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो.डॉ.एस.बी.यादव, विज्ञानशाखेच्या प्रमुख डॉ. जे.एस.ठाकूर आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष विभागाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन.वाजेकर आदी उपस्थित होते.

संजीवन म्हात्रे यांनी आपल्या भाषणात मोबाईलचा वापर सुयोग्य करायचा की, अयोग्य करायचा हे आपल्या हातात आहे, असे विद्यार्थ्यांना उद्देशुन सांगितले तसेच त्यांनी स्टँडअप कॉमेडी प्रदर्शित केली. कार्यक्रमासाठी सांस्कृतिक विभागाचे समन्वयक गणेश जगताप, सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख डॉ. गीतिका तंवर आणि विद्यार्थी परिषद आणि विद्यार्थी कल्याण विभागाच्या समन्वयक डॉ.मंदा म्हात्रे व इतर सदस्य यांनी परिश्रम घेतले.


### उरण नगरपरिषद
जिल्हा - रायगड

**फेर-५ जाहीर ई-लिलाव सुचना सन २०२४-२५**

मा. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद, उरण, यांजकडुन खालील कामासाठी इच्छुक ठेकेदार/संस्था यांजकडून जाहीर ई-लिलाव मागविणेत येत आहे.

**कामाचा विषय-** उरण नगरपरिषद मालकीच्या भुखंडावर बांधणेत आलेल्या फुलमार्केट इमारतीतील गाळे ३ वर्ष मुदतीकरिता भाडेपट्याने देणेबाबत.

| मजला | गाळा क्रं. | बांधकाम क्षेत्र चौ.मि. (कारपेट) | एकुण वार्षिक ना-परतावा अनामत रक्कम | एकुण मासिक भाडे रक्कम | फॉर्म फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिला मजला | १ | ४४.०० चौ.मि. | १,४२,०४९/- | १३,१६५/- | ५०००/- | १०,०००/- |
| | २ | ४९.०० चौ.मि. | १,५८,१९१/- | १४,६६१/- | ५०००/- | १०,०००/- |
| | ३ | ४७.०० चौ.मि. | १,५१,७३५/- | १४,०६३/- | ५०००/- | १०,०००/- |
| | ४ | ४१.०० चौ.मि. | १,३२,३६५/- | १२,२६७/- | ५०००/- | १०,०००/- |
| दुसरा मजला | १ | ४४.०० चौ.मि. | १,४२,०४९/- | १३,१६५/- | ५०००/- | १०,०००/- |
| | २ | ४९.०० चौ.मि. | १,५८,१९१/- | १४,६६१/- | ५०००/- | १०,०००/- |
| | ३ | ४७.०० चौ.मि. | १,५१,७३५/- | १४,०६३/- | ५०००/- | १०,०००/- |
| | ४ | ४१.०० चौ.मि. | १,३२,३६५/- | १२,२६७/- | ५०००/- | १०,०००/- |
| तिसरा मजला | १ | ४४.०० चौ.मि. | १,४२,०४९/- | १३,१६५/- | ५०००/- | १०,०००/- |
| | २ | ४९.०० चौ.मि. | १,५८,१९१/- | १४,६६१/- | ५०००/- | १०,०००/- |
| | ३ | ४७.०० चौ.मि. | १,५१,७३५/- | १४,०६३/- | ५०००/- | १०,०००/- |
| | ४ | ४१.०० चौ.मि. | १,३२,३६५/- | १२,२६७/- | ५०००/- | १०,०००/- |

**ई-लिलाव सादरीकरण तपशिल.**

| अ.क्रं | तपशिल | पासुन | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | ई-लिलाव प्रसिध्दी दिनांक | दि. ३१/०१/२०२५ | - |
| २ | ई-लिलाव व कागदपत्र अपलोड करणेची मुदत | दि. ३१/०१/२०२५ | दि.१०/०२/२०२५ |
| ३ | कागदपत्र व फॉर्म फी इसारा रकमेचा बँकर्स चेक अथवा डिमांड ड्राप्ट नगरपरिषद कार्यालयात जमा करणेचा दिनांक | दि. ३१/०१/२०२५ | दि.१०/०२/२०२५ |
| ४ | कागदपत्र तपासणी दिनांक | दि. १३/०२/२०२५ | दि. १३/०२/२०२५ |
| ५ | ऑनलाईन /लाइव्ह ई-लिलाव बोलीचा दिनांक | दि. १७/०२/२०२५ | दि. १७/०२/२०२५ |

**सुचना/अटी व शर्ती**

ई-लिलावात भाग घेणाऱ्यांनी युजरनेम पासवर्ड नोंदणी करुन घेणे आवश्यक राहील. तसेच स्वतःचे डिजीटल सिग्नेचर सर्टिफिकेट (DSC) वापरणे गरजेचे आहे.

१. ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छीत असलेल्या लिलावधारकांना www.eauction.gov.in या संकेतळावर सविस्तर तपशील उपलब्ध आहे.

२.ई-लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी www.eauction.gov.in या संकेत स्थळावर जावुन पात्रता मिळवणेसाठी आवश्यक दस्तऐवजाची पुर्तता करावी लागेल. तसेच आवश्यक कागदपत्रे, अटी शर्ती मान्य असल्याचे स्वाक्षरी करुन संकेतस्थळावर अपलोड करावे व त्याची प्रत नगरपरिषद कार्यालयात दि. १०/०२/२०२५ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावी.

३. दि. १०/०२/२०२५ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्राप्त झालेले दस्ताऐवजांची तपासणी करुन पात्र लिलावदारांना सुचीत करणेत येईल. तसेच पात्र लिलावदारांना कोणतेही कारण न देता ई-लिलाव नाकारण्याचे अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवणेत येत आहेत. ई-लिलाव बाबतचा अधिक तपशील नगरपरिषदेचे मिळकत पर्यवेक्षक यांचकडे मिळू शकेल.

४. त्रि- सदस्यीय समितीने ठरवून दिलेले ना-परतावा अनामत रकमेपेक्षा जादा बोलीची ई लिलाच बोली विचारात घेणेत येईल त्यापेक्षा कमी बोलीची ई-लिलाव बोली विचारात घेणेत येणार नाही...

**५. आवश्यक कागदपत्र -**

१. पॅनकार्ड २. आयकर विवरणपत्र (मागिल ३ वर्षाचे) ३. शॉप ऍक्ट लायसन्स / व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र
४. फॉर्म फी व इसारा रकमेचा बंकर्स चेक अथवा डिमांड ड्राप्ट ५. जी.एस.टी प्रमाणपत्र. ६. व्यवसाय बाबत माहितीचा अर्ज इ सर्व कागदपत्र उपरोक्त संकेत स्थळावर अपलोड करणेत येवुन त्याची एक प्रत विहित मुदतीत नगरपरिषद कर्यालयात कार्यालयीन वेळेत जमा करणे बंधनकारक राहील.

**सूचना - फॉर्म फी ५०००/-व इसारा रक्कम १०,०००/- मात्र. बॅकर्स चेक अथवा डिमांड ड्राप्ट** स्वरुपातच स्विकारणेत येतील याची नोंद घ्यावी.

**जा. क्र. उनप/ कर वि./ ६६३०/२०२४-२५**
**उरण नगरपरिषद, उरण**
**दि. ३०/०१/२०२५**

**सही/-**
**(समीर जाधव)**
**मुख्याधिकारी उरण नगपरिषद, उरण,**



Rayat Shikshan Sanstha's

### Loknete Ramsheth Thakur Public School, Kamothe



Sector-6A, Plot No.40, Kamothe. Tal- Panvel. Pin No. 410 209 Ph. No. 8779198516
Email Id:- lrtpsresume@gmail.com
CBSE Affiliation No. 1131281 School Code : 31268 Udise No. 27240816955

**Walk In Interview 2025-2026**

Walk In Interview: Date - 16.02.2025, Time - 8:30 am to 4:00 pm,
Venue: Loknete Ramsheth Thakur Public School, Kamothe

| Sr. No. | Name of the post | Qualification | No.of the post |
|---|---|---|---|
| 1 | Principal | Post Graduate with B.Ed./M.Ed. or equivalent from a recognised University. 10 years of teaching with 5 years administrative experience in CBSE School | 1 |
| 2 | Co-Ordinator | Graduate / Post Graduate with B.Ed./M.Ed. or equivalent from a recognised University. 5 years experience in CBSE School of which 2 years in Co-ordinator position | 2 |
| 3 | Pre-Primary (Nursery to Sr.KG) | H.S.C/B.A/B.Sc./B.Com. and Montessori/E.C.C.Ed./ P.T.C. (From a recognised Institute) | 4 |
| 4 | PRT Teachers (STD- 1st to 5th) English, Hindi, Marathi, Maths, Science, SST,P.E., Art, Music, Computer, | Graduate with B.Ed./M.Ed. or equivalent from a recognised University. (Preferred CTET qualified teachers) B.A. B.P.Ed./B.Sc. B.P.Ed./ B.Com. B.P.Ed. ATD / G.D. Art/BFA/ AM B.A. / M.A., Sangeet Visharad B.Sc. (IT/CS)/ M.Sc. (IT/CS)/ BCA/ MCA (with B.Ed. Preferred) From a recognised University. | 28 |
| 5 | TGT Teachers (STD- 6th to 10th) English, Hindi, Marathi, Maths, Science, SST, Computer ,Special Educator, Counsellor | Graduate/ Post Graduate in the concerned subject with B.Ed./M.Ed. or equivalent from a recognised University. (Preferred CTET qualified teachers) B.Sc. (IT/CS)/ M.Sc. (IT/CS)/ BCA/ MCA Graduate with Diploma/ Degree in Special Educator (DSE), RCI Certified (Registered) Graduate/ Post Graduate in Psychology with Certificate of Diploma in Guidance & Counselling, Clinical Psychologist, RCI Certified (Registered) | 19 |
| 6 | Librarian | B.Lib. / M.Lib. 2 years of experience in CBSE School | 1 |
| 7 | Lab Assistant | B.Sc. In Science with Experience in CBSE School | 1 |
| 8 | Clerk | B.Com./ M.Com 2 years of experience in CBSE School A/C using tally. | 2 |
| 9 | Peon | HSC,Two years' experience of working in a CBSE school preferred | 1 |
| | | | **59** |

**Roster will be applicable for Primary, Upper Primary & Secondary Teacher**

| | Category | SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | EWS | SEBC | Open | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | No.of Post | 8 | 3 | 3 | 1 | 2 | 1 | 0 | 10 | 5 | 5 | 21 | 59 |

**Instructions:**

1) Only candidates with excellent subject knowledge and a professional degree are required to appear for the interview.
2) The application form will be available on the day of interview upon payment of a non-refundable fee of Rs. 100/-.
3) Bring your original documents for verification.
4) Kindly email your CV to lrtpsresume@gmail.com from the date of this advertisement until 15/02/2025.
5) Submit your duly filled application form, along with your CV, attested copies of your documents, and a cover letter, at the office during the interview.
6) Candidates with prior work experience in a CBSE-affiliated school will be given preference.
7) The decision of the selection committee will be final.
8) Please ensure you follow all instructions carefully.

**sd/-**
**Secretary**
**Rayat Shikshan Sanstha, Satara**

## निवडक

### घरफोडीप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल :** लाकडी कपाटाचे लॉकर उघडून लॉकरमध्ये ठेवलेले पाच लाख ७५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेल्या प्रकरणी चोराविरोधात २४ जानेवारी रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सुमती पॅराडाईज, करंजाडे, कोपर येथील विद्या म्हात्रे यांच्या घरात अनोळखी व्यक्तीने प्रवेश केला आणि अलमारीत ठेवलेल्या चावीने लाकडी कपाटाचे लॉकर उघडले आणि लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याचा हार, अंगठी, ब्रेसलेट असे पाच लाख ७५ हजाराचे सोन्याचे दागिने चोरून नेले. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

### चिरनेरमध्ये माघी गणेशोत्सव

**उरण :** तालुक्यातील ऐतिहासिक चिरनेर गावातील अत्यंत प्राचीन अशा श्री महागणपती मंदिरात माघी गणेशोत्सव होणार



आहे. सर्व भक्तगणांची गैरसोय होऊ नये, सर्वांना सुखकर सोयी सुविधा मिळून, रांगेत दर्शन घेता यावे, वाहतूक कोंडी होऊ नये, गणेश भक्तांना पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय व महाप्रसादाची व्यवस्था व्हावी, त्याचबरोबर कोणताही अनुचित व उत्सवाला गालबोट लागणारा प्रकार घडू नये, यासाठी कडक बंदोबस्त, तसेच चिरनेर गणपती देवस्थान प्रशासनाकडून आवश्यक व सुसज्ज असे नियोजन करण्यात आले आहे. माघी गणेश जन्मोत्सव गुरुवार ३० जानेवारी ते रविवार २ फेब्रुवारी २०२५ पर्यंत चालणार आहे.

# पनवेल मनपातर्फे मालमत्ता कर थकबाकीदारांना नोटीसा व वॉरंट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिकेचा मालमत्ता कर न भरलेल्या थकबाकीदारांना जप्तीपुर्व नोटीसा व वॉरंट बजावण्यास पालिकेने सुरूवात केली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार मालमत्ता कर विभागाच्या जप्ती पथकाच्या कर्मचाऱ्यांनी आजपर्यंत चारही प्रभागामध्ये एकुण ४४७ जप्तीपूर्व नोटीसांचे वाटप केले असून २७ वॉरंट बजावण्यात आले आहेत.

महानगरपालिका क्षेत्रातील चारही प्रभागामधील सुमारे तीन लाख ५० हजार मालमत्तांना कर आकारणी करण्यात आली आहे. सध्याच्या आर्थिक वर्षामध्ये एप्रिल महिन्यापासून आजपर्यंत ३१४.५ कोटी इतकी वसुली झाली आहे. त्यानुसार मालमत्ता कर उपायुक्त व सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे व जप्ती पथकामधील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अधीनस्त असलेल्या सर्व मालमत्ताधारकांना प्रवृत्त करुन लवकरात लवकर महानगरपालिकेस मालमत्ता कराचा भरणा करून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. मालमत्ता कराचा भरणा न केल्यास जप्ती व अटकावणी कारवाई करण्यात येईल, अशा सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२८ व अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम ४७ अन्वये महानगरपालिकेस देय असलेल्या कराच्या थकबाकी पोटी जंगम स्थावर मालमत्ता जप्त अथवा अटकावणी करुन जाहिर लिलावाने विक्री करून थकबाकी वसूल करणेची तरतूद महानगरपालिकेस आहे. त्यानूसार नोटीस देऊनही मालमत्ता कराचा भरणा न केलेल्या थकबाकीदारांना उपायुक्त व सहाय्यक आयुक्त यांच्या सूचनेनूसार, कर अधीक्षक महेश गायकवाड व करअधीक्षक सुनिल भोईर यांच्या जप्ती पथकामार्फत खारघर, उपविभाग नावडे, कळंबोली कामोठे, पनवेल व नवीन पनवेल प्रभागामधील थकबाकीदारांना जप्ती व अटकावणीची कारवाई करण्यात येत आहेत.

**अनेक ठिकाणी वसुली**

**महापालिकेच्या वतीने अटकावणीची कारवाई सुरू केल्यानंतर मालमत्ताधारकांनी कराचा भरणा करण्यास सुरुवात केली आहे. या कारवाई अंतर्गत प्रकाश फके यांच्या नेतृत्वातील खारघर वसुली पथकाने एका प्रसिद्ध मॉलकडून ८६ लक्ष रुपये वसूल करण्यात आले आहे तसेच खारघरमधील एका प्रसिद्ध शिक्षण संस्थेकडून ४.६९ कोटी वसूल करण्यात आले आहे.**

महापालिकेच्या सर्व प्रस्तावित कामांसाठी मालमत्ता कर हा प्रमुख स्त्रोत आहे. मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा २ टक्क्यांची वाढ होत असल्याने नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी 'PMC TAX APP' मोबाईल ॲप विकसित केले आहे. तसेच www.panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात चित्रकला स्पर्धा

**उरण : प्रतिनिधी**

नवघर येथील भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात उरण वाहतुक पोलिसांच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान २०२५ चे अनुषंघाने चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेमध्ये सहावी ते नववी च्या एकूण ३०७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी प्रत्येक वर्गामध्ये तीन विद्यार्थी असे एकूण १२ विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकवलेल्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले. तसेच इतर विद्यार्थ्यांनाही स्पर्धेमध्ये सहभागी झाल्याबद्दल सर्टिफिकेट वाटप करून गौरविण्यात आले.

ही स्पर्धा उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांचे मार्गदर्शनाखाली झाली. या वेळी अतुल दहिफळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वाहतुक नियमांबाबत मार्गदर्शन केले. स्पर्धेकारिता शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. ठाकूर यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमासाठी शाळेचे चेअरमन, पोलीस हवालदार प्रमोद पाटील, अमोल बुधनवर, पुजारी, निलेश मोरे व इतर शिक्षक वर्ग उपस्थित होते.





**पनवेल : पत्रकार वसीम पटेल यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर व हलीमाबाई झुलेवाली ट्रस्टचे मुख्य विश्वस्त हनिफ कच्छी यांनी शुभेच्छा दिल्या.**

# आगरी समाज वधु-वर परिचय मेळावा; मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल उरण आगरी समाज मंडळाचे अध्यक्ष अतुल पाटील यांच्या नेतृत्वाखाली मंडळाने या वर्षी २८वा वधू-वर परिचय मेळावा मंडळाच्या महात्मा फुले सभागृहात आयोजित केला होता.



मेळाव्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे उपस्थित होते. या वधु-वर परिचय मेळाव्यात २२० मुले व १२५ मुलींनी सहभाग नोंदवला. सोबत त्यांचे आईवडील पालक आले होते. प्रथम दहा मुले व नंतर दहा मुली स्टेजवर येऊन आपला स्वतः चा परिचय करून देत होत्या. सोबत सूत्रसंचालक त्यांना मदत करायचे. या कार्यक्रमामुळे हे भव्य सभागृह खचाखच भरले होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या सुंदर उपक्रमाबद्दल मंडळाच्या सदस्यांची वाहवा केली. आगरी समाज हा पुढे जात आहे. शैक्षणिक दृष्ट्या समाजातील मुले मुली भरपूर शिक्षण घेत आहेत. त्यामुळे आपले जीवन घडवीत असताना त्यांनी लवकरात लवकर विवाह बंधनात अडकावे. या मेळाव्यात आपल्या पसंतीचे वधू, वर शोधावे आपणास माझ्या शुभेच्छा. मंडळाच्या कार्यकर्त्यांचे घेतलेल्या मेहनतीबद्दल जाहीर कौतुक करतो, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे उपाध्यक्ष जे.डी. तांडेल यांनी केले. मंडळाचे अध्यक्ष अतुल पाटील म्हणाले, आज सभागृहात या परिचय मेळाव्याद्वारे जास्तीत जास्त लग्न जमू दे हीच मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. हा उपक्रम राबवण्यासाठी मंडळाचे सचिव बी.पी. म्हात्रे व कोषाध्यक्ष विजय गायकर यांनी प्रयत्न केले आहेत. सोबत त्यांनी त्यांचे आईवडिल लोकनेते दि.बा. पाटील साहेब व उर्मिलाताई पाटील यांच्या विवाहाची भाराऊन टाकणारी गोष्टी सांगितली. या भव्य मेळाव्याचे सूत्रसंचालन विजय गायकर यांनी केले.

सोबतीला म्हात्रे सर, डॉ. सुभाष घरत, मेधा तांडेल, सायली गायकर होत्या. कार्यक्रमासाठी मंडळाचे उपाध्यक्ष आनंदराव पाटील, काशिनाथ गोंधळी, कमलाकर पवार, स.क. पाटील, कुमार ठाकुर, डी.बी. पाटील, मोकल, शशिकांत पाटील, विद्याधर पाटील आदी उपस्थित होते.

# केदार भगत यांच्या वाढदिवसानिमित्त आदिवासी विद्यार्थ्यांना अन्नदान

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शुभेच्छा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते केदार भगत यांचा वाढदिवस गुरुवारी (दि.३०) ६०० आदिवासी विद्यार्थ्यांना अन्नदान करून साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त केदार भगत यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आशीर्वाद घेतले.



या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह भाजप नेते वाय.टी.देशमुख, टीआयपीलचे संचालक अमोघ ठाकूर यांनी भगत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या वेळी पत्रकार विशाल सावंत, प्रवीण मोहोकर, सुमित दसवते, फिरोझ शेख, राजेंद्र भगत, नितेश भगत, रवी पारचे, संतोष वर्तले, चिन्मय भगत, चेतन म्हसकर, यज्ञेश पाटील, ब्रिजेश बहिरा, जयदीप भगत, संकेत दसवते, अभिषेक भालेकर, निहाल पाटील, शेषनाथ गायकर तसेच शाळेचे मुख्याध्यापक विष्णू गायकर आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये लोकनेते दि. बा पाटील शाळेत हायलाइट वॉलचे अनावरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका शिक्षण विभाग व आयटीच स्कुल्स संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने लोकनेते दि. बा पाटील शाळा इंग्रजी माध्यम मनपा शाळा क्र १ मध्ये नुकतेच 'स्कुल हायलाइट वॉल'चे अनावरण उपायुक्त-शिक्षण विभाग प्रसेनजीत कार्लेकर यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळी सहाय्यक आयुक्त-शिक्षण स्मिता काळे, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, अधीक्षिका कीर्ती महाजन आणि प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक वाल्मिक राठोड व शाळेच्या मुख्याध्यापिका कोंकणा राहा उपस्थित होते. शाळेच्यावतीने डमिन वैभव बोरोले आणि आयटिच संस्थेचे गव्हर्नमेंट पार्टनरशिप टीमचे सुशांत खिलारे उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका आणि आयटीच स्कुल्स या संस्थेच्या मार्फत लोकनेते दि. बा पाटील इंग्रजी माध्यम मनपा शाळा क्र १ हि शाळा चालवली जाते.

विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना मिळणारे यशाची सर्वांना माहिती मिळावी यासाठी आयटीच स्कुल संस्था आणि शिक्षण विभाग पनवेल महानगरपालिका यांच्यावतीने शाळेची 'हायलाईट वॉल' सुरू करण्यात आली आहे.

# चांभार्ली येथे वैद्यकीय शिबिर

**रसायनी : प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त चांभार्ली येथे मोफत वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. चांभार्ली येथील डॉ. विलास कुलकर्णी यांचे विजय क्लिनिक व मेडिकव्हर हॉस्पिटल खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर झाले.

यामध्ये ७२ रुग्णांनी लाभ घेतला. सीबीसी शुगर, हृदयरोग किडनी रोग वरील रक्त चाचण्या तसेच ECG या सर्व तपासण्या मोफत करण्यात आल्या.

डॉ विलास कुलकर्णी हे येथे दरवर्षी असे मोफत शिबिर भरवतात ते त्यांनी रसायनी पाताळगंगा मेडीकल असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून मागील वर्षी काम केले होते आणि रसायनी ब्राह्मण सभेसाठीही मोफत शिबिर भरवले होते.



# पनवेल मनपातर्फे विद्यालयात 'पर्यावरण तास'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षण याचे महत्त्व शालेयस्तरावर बाल वयात विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये 'पर्यावरण तास' हा उपक्रम पनवेल महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय खारघर येथे महापालिकेच्या वतीने 'चर्चासत्राचे' आयोजन करण्यात आले.



माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्व शालेय विद्यार्थ्यांना समजावे यासाठी पर्यावरण तास हा उपक्रम उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनूसार महापालिका कार्यक्षेत्रातील विद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्वाच्या घटकांनूसार कृती कार्यक्रम, शिबिरे, व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजूषा, चर्चासत्र, विविध खेळांचे आयोजन विद्यालयांमध्ये करण्यात येते.

रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात 'पर्यावरण तास' या उपक्रमांतर्गत झालेल्या चर्चासत्रामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. तसेच या वेळी विद्यार्थ्यांनी माझी वसुंधराची शपथ घेतली. या वेळी विद्यालयाच्या प्राचार्य निशा नायर यांचे सहकार्य लाभले.

# रामशेठ ठाकूर विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा

**खारघर : रामपहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात अध्ययन व विविध स्पर्धांमध्ये पाविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

दहावी बोर्ड परीक्षा मार्च २०२४ मध्ये विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला होता या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या प्रथम तीन विद्यार्थ्यांना तसेच विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्हे देवून गौरव करण्यात आला या गुणवंत विद्यार्थ्यांना अध्यापनाचे काम करणाऱ्या विषय शिक्षकांचाही सन्मानचिन्हे देवून गौरव करण्यात आला.

विद्यालयात वर्षभर विविध उपक्रम विभागामार्फत विविध स्पर्धाचे आयोजन केले जाते या उपक्रमांच्या स्पर्धात प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्हे देवून गौरव करण्यात आला

जिल्हास्तरीय, विभागस्तरीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धामध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्सफुर्तपणे सहभागी होत सर्वाधिक एकूण ११४ पदके विद्यालयास प्राप्त करून दिली आहेत. या स्पर्धामध्ये उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थी खेळाडूंना सन्मानचिन्हे व प्रमाणपत्र देवून त्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचलनालय, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी, रायगड तसेच पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने आयोजित केलेल्या जिल्हा क्रीडा स्पर्धामध्ये रायगड जिल्हयामधून या खेळ स्पर्धामध्ये १७ वर्षवयोगटात सर्वाधिक सहभाग व मर्वाधिक पदके मिळविल्या बददल विद्यालयास महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत रुपये एक लाख प्रोत्साहनपर अनुदान जाहिर झाल्याबद्दल विद्यालयाचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयातील सभागृहामध्ये करण्यात आले होते. समारंभ अध्यक्ष म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष तथा भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची उपस्थिती लाभली. यासोबतच सरचिटणीस प्रल्हाद केणी, युवा नेते शुभ पाटील आदी उपस्थित होते.



## संपादकीय

# गुणवत्तावाढीची गरज

कोरोना काळातील लॉकडाऊन आणि ऑनलाईन शिक्षणामुळे देशातील विशेषत: ग्रामीण भागातील शालेय शिक्षणाच्या दर्जात घसरण झाली होती. ते चित्र आता बदलले असून प्राथमिक शाळा स्तरातील मुलांच्या अध्ययनात थोडीफार प्रगती झाल्याचे यंदाच्या 'असर' या वार्षिक शैक्षणिक अहवालातून समोर आले आहे.

**'प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन' ही संस्था प्रतिवर्षी देशभर सर्वेक्षण करून 'न्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट' अर्थात 'असर' हा वार्षिक अहवाल प्रसिद्ध करते. देशातील शालेय शिक्षणाचा, विशेषत: सरकारी शाळांमधील शिक्षणाचा दर्जा कसा आहे याची चर्चा या अहवालाच्या निमित्ताने होत असते. कोविड कालखंडात प्रदीर्घ काळ मुले शाळांमधील प्रत्यक्ष शिक्षणापासून दूर राहिली. त्यानंतरच्या म्हणजे २०२२च्या 'असर' अहवालात प्रत्यक्ष शालेय शिक्षणातील या खंडाचे दुष्परिणाम ठळकपणे दिसले होते. तिसरीच्या विद्यार्थ्यांना दुसरीचे पुस्तक वाचता येत नाही व वजाबाकीची गणितेही सोडवता येत नाहीत हे तेव्हा मोठ्या प्रमाणात दिसून आल्याने चिंता व्यक्त केली गेली होती, परंतु ते चित्र आता पालटले असून या कौशल्यांमध्ये सुधारणा झाल्याचे समोर आले आहे. तिसरीच्या विद्यार्थ्यांना दुसरीचे पुस्तक वाचता येण्याचे प्रमाण २०१८ साली २७.३ टक्के होते. कोविड काळात यात घसरण होऊन २०२२ मध्ये ते २०.५ टक्क्यांवर घसरले होते. या परिस्थितीत हळूहळू सुधारणा होत २०२४ मध्ये ते पुन्हा २७.१ टक्क्यांवर म्हणजे कोविडपूर्व काळाच्या स्थितीवर आले आहे ही आनंदाची बाब आहे. कोविड काळात एकंदरच सरकारी शाळांनी ग्रामीण भागात शिक्षणाची जबाबदारी उत्तमरित्या सांभाळली होती. त्याकाळात सरकारी शाळांमधील विद्यार्थी नोंदणीचे प्रमाणही वाढले होते. आता कोविड कालखंड मागे पडून बहुतेकांची आर्थिक स्थिती पूर्वपदावर आल्यामुळे की काय, पुन्हा एकदा खाजगी शाळांकडे विद्यार्थी वळू लागले आहेत असे दिसते. २०२२ मध्ये सरकारी शाळांमधील पटनोंदणी ७२.९ टक्क्यांवर गेली होती. ती आता ६६.८ टक्क्यांवर घसरली आहे. पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह यांसारख्या मूलभूत सुविधांसह संगणकांची उपलब्धता याबाबतीत सरकारी शाळांमध्ये अभाव दिसत असल्याने खाजगी शाळांचा पर्याय निवडला जात असल्याचे दिसते. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे एकंदरच अधिक सकारात्मक बदलांची अपेक्षा आहे. त्या पार्श्वभूमीवर वाचन कौशल्य व गणिती कौशल्यात झालेली सुधारणा ही स्वागतार्हच आहे, परंतु अद्यापही विद्यार्थी आणि शिक्षकांचे प्रमाण, शिक्षकांचे प्रशिक्षण व शिक्षकांवर वेळीअवेळी पडणारा सरकारी कामांचा बोजा यासंदर्भात परिस्थितीत फारसे काही बदलल्याचे दिसत नाही. नव्या शैक्षणिक धोरणाचा प्रभाव खऱ्या अर्थाने दिसायचा असेल तर या महत्त्वाच्या बाबींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही हे संबंधितांनी लक्षात घ्यायला हवे. गेल्या काही वर्षांत कर्नाटक, तामिळनाडू या दक्षिणेतील राज्यांमधील शालेय शिक्षणाचा दर्जा अधिक प्रमाणात सुधारल्याचा दावा केला जातो. त्यादृष्टीने 'असर'मधील निरीक्षणांकडे गांभीर्याने पाहून आणखी काही ठोस बदल घडवून आणण्याची गरज आहे का हे तपासले पाहिजे. 'असर'च्या या सर्वेक्षणात विद्यार्थ्यांच्या डिजिटल साक्षरतेकडे विशेष लक्ष दिले गेले. स्मार्टफोनवर गजर लावणे, व्हॉट्सॲप, टेलिग्राम आदींचा संदेश पाठवण्यासाठी वापर करणे, युट्यूबवर व्हिडिओ शोधणे आदी बाबी तपासल्या असता विद्यार्थ्यांना ही कौशल्ये उत्तमरीत्या अवगत असल्याचे दिसले, परंतु १४ ते १६ या वयोगटातील विद्यार्थी स्मार्टफोनचा वापर शालेय कारणांऐवजी समाजमाध्यमांकरिता अधिक करतात हे चित्र मात्र निश्चितच बदलायला हवे आहे.**

# मासेमारी बंदरे रूतली गाळात





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्ह्याला मोठा समुद्रकिनार लाभला आहे. खाडी आहेत. त्यामुळे येथे मच्छिमारीचा व्यवसायदेखील मोठ्या प्रमाणावर चालतो, परंतु मच्छीमारी करणाऱ्याना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. डिझेलचा परतावा वेळेत मिळत नाही. नुकसानभरपाई मिळत नाही. मासेमारी बोटीवर काम करण्यासाठी माणसे मिळत नाहीत. मासे उतरवण्यासाठी जेट्टी नाहीत. जेट्टी असेली तरी तेथे आवश्यक असलेल्या सुविधा नाहीत. आत मच्छीमारी करणार्यांना गाळाच्या समस्येला तोड द्यावे लागत आहे. रायगड जिल्ह्यातील अनेक बंदरे तर गाळात रूतत चालील आहेत. गाळ समस्येमुळे मचछीमारांना बंदरात येण्याजाण्यासाठी भरतीच्या पाण्यावर अवलंबून रहावे लागत आहे. या बंदरांमधील गाळ काढण्यात यावा अशी मागणी मच्छीमारांकडून केली जात आहे. शासनाने याकडे गांभीर्याने पाहिजे पाहिजे.

रायगड जिल्ह्यात अनेक मासेमारी केंद्र आहेत. त्यापैकी अलिबाग आणि आक्षी साखर ही जिल्ह्यातील प्रमुख मासेमारी केंद्र म्हणून ओळखली जातात. अलिबाग हे रायगड जिल्ह्याच्या मुख्यालयाचे ठिकाण आहे. हीचे मासेमारी बंदरी बंदरांमध्ये अनेक समस्या आहे. अलिबाग, आक्षी साखर ही बंदरांना गाळाची समस्या आहे. येथे गाळ मोठ्या प्रमाणावर साचल्यामुळे मच्छीमार बांधवांना अनेक समस्यांनी तोड द्यावे लागत आहे. गेली अनेक वर्ष बंदर गाळाने भरले आहे. त्यामुळे बोटी किनार्यावर लावतांना अडचणी येतात. तासंतास भरतीच्या पाण्याची वाट पाहात बसावे लागले. बरेचदा बोटी गाळात रुततात. त्यामुळे हा गाळ काढणे आवश्यक आहे.

अलिबाग, आक्षी साखर बंदारात यांत्रिक आणि बिगर यांत्रिक पध्दतीच्या सातशेहून अधिक बोटी या परिसरात कार्यरत आहेत. ज्या माध्यमातून दरवर्षी मासेमारीतून करोडो रुपयांची उलाढाल होत असते. मात्र सध्या आक्षीतील साखर आणि अलिबाग येथील मासेमारी बंदरे गाळात रुतली आहेत. खाडीत येण्या जाण्याच्या मार्गात गाळाची बेटे तयार झाली आहेत. त्यामुळे बोटींना मार्गक्रमण करण्यात अडथळे निर्माण झाले आहेत. ओहोटीच्या वेळी मोठ्या बोटींना येजा करण्यात अडचणी येत आहे. त्यामुळे भरतीच्या वेळीच मासेमारी बोटींना ये जा करावी लागते. त्यामुळे बोटींचा तासंतास खोळंबा होतो,

ही बाब लक्षात घेऊन अलिबाग खाडी मार्गातील नौकानयन मार्गातील गाळ काढण्यात यावा. खाडीचे खोलीकरण करण्यात यावे आणि मुंबईतील ससून डॉकच्या धर्तीवर अलिबाग आणि साखर येथील जेटीचा विकास केला जावा अशी माणगी केली जात आहे. आक्षी साखर येथील मासेमारी बंदर विकासासाठी शासनाने १५९ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. यात ग्रोयन्स बंधारा, जेट्टी, पोहोच रस्ता आणि खाडी मार्गातील गाळ काढण्याच्या कामांचा समावेश होता. मात्र अद्याप पर्यंत ही कामे हाती घेण्यात आलेली नाही. त्यामुळे ही कामे तातडीने सुरू होणे गरजेचे आहे.

गाळामुळे मचछीमार बोटींना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. बरेचदा बोटी खाडी अडकून पडतात. ज्यामुळे बोटींचे नुकसान होते. काही दिवसांपुर्वीच साखर येथील लक्ष्मण बामजी यांची बोट अलिबाग जवळ बुडाली होती. ज्यात १५ खलाशी थोडक्यात बचावले होते. शेवटी इतर बोटींच्या साह्याने या बोटीला खेचून किनार्यावर आणण्यात आले होते. मोठ्या बोटींनी गाळामुळे खोल समुद्रात थांबावे लागले. छोट्या बोटींना बोलवून त्यावरील मासे किनार्यावर आणावे लागतात.

गाळामुळे सध्या मोठ्या बोटी भरतीच्या वेळीच बोटी येजा करू शकतात. त्यामुळे भरती ओहोटीच्या वेळेवरच मच्छिमारांना त्यांचे नियोजन करावे लागते. गाळ समस्या दूर झाली तर बंदरात कधीही बोटींची वाहतूक होऊ शकेल. असे पर्ससीन वेल्फेअर असोसिएशनचे संघटक डॉ. कैलास चेऊलकर यांचे म्हणणे आहे. त्यात तथ्य आहे. शासनाने या बंदारांमधील गाळ गाढून येथे चांगल्या सुविधा उपलबध्द करून द्यायला हव्यात.

अलिबाग , साखर खाडीतील गाळ गाढून खोलीकरण केल्यास तेथे केवळ मच्छीमारी बोटीच लागतील असे नाही. भविष्यात येथून प्रवासी जलवाहतुक देखील सुरू करता येईल. त्याचा फायदा पर्यटन व्यवसायास होणार आहे.

अलिबाग हे जिल्ह्याचे मुख्यालय आहे. त्याच बरोबर मोठे पर्यटन स्थळ देखील आहे. पण अलिबाग येथे बंदर उपलब्ध नसल्याने अलिबागमार्गे जलप्रवासी वाहतूक करता येत नाही. त्यासाठी मांडवा अथवा रेवस बंदरांवर अवलंबून राहावे लागते. मेरीटाईम बोर्डाने पुढाकार घेऊन अलिबाग, आक्षी साखर खाडीतील गाळ काढून खाडी मार्गाचे खोलीकरण केल्यास थेट अलिबागहून जलप्रवासी वाहतूक सुरू करणे शक्य होणार आहे. अलिबाग येथून कुलाबा, खांदेरी आणि उंदेरी या सागरी किल्ल्यांवर प्रवासी वाहतूक या माध्यमातून सुरू करणे शक्य होणार आहे. त्यामुळे मासेमारी बंदरांबरोबर अलिबाग येथे प्रवासी जेटीही विकसित करण्याची मागणी केली जात आहे. त्याचा विचार शासनाने करायला हवा. केवळ अलबागच नव्हे तर रायगड जिल्ह्यातील जी बंदरे गाळात रूतली आहेत तेथील गाळ काढून या बंदरांमधून प्रवसी वाहतुक सुरू केल्यास जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळू शकेल.



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲप अकाऊंट फेसबुक, इन्स्टाशी करू शकता लिंक



तुम्ही आता तुमचं व्हॉट्सॲप मेटाच्या अकाउंट्स सेंटरशी कनेक्ट करू शकता. याच्या मदतीने तुम्ही फेसबुक किंवा इन्स्टाग्राम स्टोरीवर थेट व्हॉट्सॲप शेअर करू शकता. या फीचरचा मुख्य उद्देश तुम्हाला मेटाचे वेगवेगळे ॲप्स सहजपणे वापरण्यास सक्षम करणं आहे. जर तुम्ही अनेकदा व्हॉट्सॲप तुमचे स्टेटस अपडेट करत असाल आणि इन्स्टाग्राम किंवा फेसबुकदेखील वापरत असाल, तर तुम्ही या प्लॅटफॉर्मवर तुमचे व्हॉट्सॲप थेट शेअर करण्यासाठी या फीचरचा वापर करू शकता. तुम्हाला वेगवेगळ्या ठिकाणी पोस्ट करण्याची आवश्यकता नाही, ज्यामुळे तुमचा वेळ आणि मेहनत वाचेल. तुम्ही तुमच्या मित्रांशी सहजपणे जोडलेले राहू शकाल.


अकाउंट लॉगिन फीचरसह तुम्ही व्हॉट्सॲप किंवा इतर मेटा ॲप्समध्ये सहजपणे लॉगिन करू शकता. विशेषतः जेव्हा तुम्ही डिव्हाइस बदलता किंवा लॉगआउट करता. जरी हे फीचर पर्यायी असले तरी मेटा भविष्यात हे फीचर वापरण्याची योजना आखत आहे, जेणेकरून तुम्ही तुमचा अवतार मॅनेज करू शकाल आणि एप्सवर एआय स्टिकर्स शेअर करू शकाल.

मेटा म्हणते की, युजर्सची प्रायव्हसी त्यांच्यासाठी खूप महत्वाची आहे. व्हॉट्सॲपमध्ये एंड–टू–एंड एन्क्रिप्शन आहे, म्हणजेच तुमचे मेसेजेस आणि कॉल्स सुरक्षित राहतात. कंपनीचं म्हणणं आहे की, अकाऊंट सेंटरशी कनेक्ट केल्याने तुमच्या सुरक्षिततेवर कोणताही परिणाम होणार नाही.

**व्हॉट्सॲपला अकाऊंट्स सेंटरशी जोडण्यासाठी हे करा**

तुमचे ॲप अपडेट करा–सर्वप्रथम तुमच्या फोनवर व्हॉट्सॲपची नवीन व्हर्जन असल्याची खात्री करा, सेटिंग्ज वर जा–व्हॉट्सॲप ओपन करा आणि सेटिंग्ज वर जा, ऑप्शन शोधा–अकाउंट्स सेंटरमध्ये तुमचं अकाऊंट जोडण्याचा पर्याय शोधा. जर तुम्हाला हा पर्याय दिसत नसेल तर कदाचित हे फीचर तुमच्या प्रदेशात अद्याप उपलब्ध नसेल, तुमचं अकाऊंट लिंक करा–या पर्यायावर टॅप करा आणि सूचनांचं अनुसरण करा. आवश्यक असल्यास तुमच्या मेटा अकाऊंटने लॉगिन करा, शेअरिंग सेटिंग्ज एडजस्ट करा–तुम्हाला तुमचे अपडेट्स कसे शेअर करायचे आहेत ते सेट करा.

# गीतकार, कवी व लेखक गंगाधर महांबरे



**निमित्त**

गंगाधर महांबरे हे मराठी लेखक, कवी व गीतकार होते. त्यांचा जन्म ३१ जानेवारी १९३१ रोजी कोकणातील मालवण येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण मालवणच्या रघुनाथ देसाई या मराठी शाळेत, तर माध्यमिक शिक्षण टोपीवाला हायस्कूलमध्ये झाले. शालांत परीक्षा १९४९ साली ते उत्तीर्ण झाले. त्यानंतर १९५६ साली त्यांनी बीएची पदवी मिळविली. मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात काही काळ त्यांनी ग्रंथपाल म्हणून नोकरी केली. त्यानंतर पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये, किर्लोस्कर ऑईल इंजिनच्या ग्रंथालयात आणि पुण्याच्या ऑटोमोटिव्ह रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये ग्रंथपाल म्हणूनही काम पाहिले.

महांबरे यांच्या लेखनाची सुरुवात १९४८पासून झाली. 'दिलजमाई', 'रंगपंचमी', 'सिंधुदुर्ग', 'कोल्हा आणि द्राक्षे' अशा अनेक नाटिका. 'देवदूत', 'संतांची कृपा', 'नजराणा' इ. नाटकं. 'गौतमबुद्ध', 'जादूचा वेल', 'जादूची नगरी', 'बेनहर' ही बालसाहित्याची पुस्तके; तर 'चार्ली चॅपलीन, वॉल्ट डिस्नी यांची चरित्रे' इ. त्यांचे लेखन प्रसिद्ध आहे. रंगभूमीवरील गाण्यांचा संग्रह, नाटकातील गाणी, महाराष्ट्र गौरवगीते, पी. सावळाराम, आचार्य अत्रे, वि. स. खांडेकर, ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे यांच्या गीतांचे संग्रह त्यांनी संपादित केले तसेच 'आपली आवड', 'उषःकाल', 'रसिका तुझ्याचसाठी', 'मराठी गजल', 'आनंदाचे डोही' इत्यादी त्यांचे गीत संग्रह प्रकाशित आहेत.

उत्तम भावगीतरचनांप्रमाणेच त्यानी सुरेख चित्रदर्शी भावरम्य चित्रपट गीते लिहिली होती. त्यामुळे त्यांची चित्रपटगीतकार म्हणून सर्वदूर ख्याती पसरली. 'तिन्ही सांजा सखे मिळाल्या, नववधू प्रिया मी बावरते, मधू मागशी माझ्या सख्यापरी, जन पळभर म्हणतील हाय हाय', 'मावळत्या दिनकरा' इत्यादी कित्येक गीते आज आकाशवाणी, टीव्ही, सीडी या माध्यमातून लोकप्रिय झालेली आहेत. त्यांनी 'कंठातच रुतल्या ताना','संधीकाली या अशा', 'नयनात तुझ्या सखि सावन का?' अशा कित्येक सुंदर उत्कट भावकविता लिहिल्या.

भारतीय आकाशवाणीचे एक मान्यवर गीतकार म्हणून महांबरे यांचे आकाशवाणीसाठी योगदान आहे. चित्रपट रंगभूमी, आकाशवाणी, दूरदर्शन, ध्वनीमुद्रिका, संगीत मैफल, कॅसेटस् आणि आता सीडी इत्यादी माध्यमांनी कवी गंगाधर महांबरे यांच्या गीतांचा अनुरुप उपयोग करून घेतला आहे. 'रसिका तुझ्याच साठी' या त्यांच्या गीताची ध्वनिमुद्रिका एका अमेरिकन कंपनीनेही प्रसिद्ध केली होती. सुप्रसिद्ध नाटककार व बंगाली वाङ्मयाचे अभ्यासक मालवणचे नामवंत साहित्यिक भार्गवराम विठ्ठल तथा मामा वरेरकर यांचा जीवनपट चितारणारे 'एक अविस्मरणीय मामा' हा छोटासा चरित्रग्रंथ महांबरे यांनी लिहिला आहे.


नवी दिल्ली येथील नॅशनल प्रोडक्टिव्हिटी कौन्सिलने महांबरे यांना १९८३ साली पोएट ऑफ दि इयर हा सन्मान दिलेला असून गोव्याच्या गोमंतक मराठी अकादमीने सन्माननीय फेलोशिप दिली होती. केंद्र सरकारचे आणि महाराष्ट्र सरकारचे अन्य पुरस्कारही त्यांना प्राप्त झाले होते. अशा या चतुरस्त्र लेखकाचे २३ डिसेंबर २००८ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# अशा प्रकारे तुमच्या हृदयाला राखा उत्तम



